वाचले :- १) शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र.अहत १६१०/प्र.क्र.६४/१०/११-अ, दि.४/२/२०११
२) इकडील आदेश क्र. पसह/कावि/११९३/२०१२, दि. ६/१०/२०१२
३) इकडील आदेश क्र. पसह/कावि/१६९९/२०१२, दि. १४/१२/२०१२
४) मा. पालकमंत्री यांचेकडील पत्र क्रं. जा.क्रं.पालकमंत्री/अन्न व ना.पु. आणि ग्रा.सं.अ.औ.प्र.व सं.कार्य /व्ही.आय.पी./५२७ दिनांक- २६/०३/२०१.

जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे
सर्वसाधारण शाखा
क्र.सशा/पसह/कावि/६१३/२०१६
दि. ४/०४/२०१६

विषय :- पुणे जिल्हा भ्रष्टाचार निमुर्लन समिती

आदेश

शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.अहद १६१०/प्र.क्र६४/१०/११-अ, दि.४/२/२०११ मधील सुचनांनुसार मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचे अध्यक्षतेखाली पुणे जिल्हा भ्रष्टाचार निमुर्लन समिती गठीत करणेत आलेली आहे. उक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर समितीमधील अशासकिय सदस्यांचा कार्यकाल दोन वर्षे पुर्ण झाल्याने संपुष्टात आलेला आहे. तरी समितीवर अशासकिय सदस्यांची नव्याने नियुक्ती करणेकामी अशासकिय सदस्यांचे नावांचा समावेश करुन खालीलप्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करणेत येत आहे.

अ.क्र.	समितीची रचना	नाव व पत्ता	पद
१	जिल्हाधिकारी, पुणे	जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे	अध्यक्ष
२	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे	जिल्हा परिषद, पुणे	सदस्य
३	पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण	चव्हाणनगर, पाषाण, पुणे-८	सदस्य
४	पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे	सी बरॅक, मध्यवर्ती इमारत, पुणे-१	सदस्य
५	कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे	कोथरुड, कर्वेपुतळयाजवळ, पुणे	सदस्य
६	कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे	मध्यवर्ती इमारत, पुणे-१	सदस्य
७	जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, पुणे	कृषी महाविद्यालय आवार, पुणे-५	सदस्य
८	जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था	कृषी महाविद्यालय आवार, पुणे-५	सदस्य
९	अशासकिय सदस्य		
	१) शासकिय व संरक्षण दलातील सेवानिवृत्त व्यक्ती	श्री. विलास महादेव पंगुडवाले, रा. ४७०, जुना बाजार, गवळी वाडा, खडकी, पुणे ४११ ००३. मो.नं.९८२२६६७२४८	सदस्य
	२) स्वातंत्र्य सैनिक	श्री. विठ्ठल परशुराम महाजन, रा.५७६ शनिवार पेठ, केसरी ऑफीस समोर पुणे ४११ ०३०	सदस्य

	३) स्वयंसेवी संस्थेचा प्रतिनिधी	श्री. ज्ञानेश्वर सखाराम लांढे, ताकवे बु.ता. मावळ, जि. पुणे मो. नं.८६२३८४४२२९	सदस्य
	४) लोकांचा विश्वास संपादित केलेल्या व्यक्ती	श्री. विजय आबासाहेब मरळ-देशमुख, रा. सुर्या हॉस्पिटल जवळ, कसबा पेठ, पवळे चौक, पुणे ४११ ०११ मो.नं.९९२२६०९७९७	सदस्य
	५) लोकप्रतिनिधी	श्रीमती कल्पना संभाजी थोरवे, रा. १८/१ संतोषनगर, संकल्प बंगला, कात्रज पुणे ४११ ०४६. मो.नं.९८५०६८८८८९	सदस्य
	६) अण्णा हजारे सुचवतील अशी व्यक्ती	--	सदस्य
	७) प्राचार्य	श्री. वरद वैशंपायन, ता. दौंड, जि. पुणे मो.नं.९४२३१६२१९३	सदस्य
	८) समाजसेवक	श्री. रामदास कैलास केंजळे, स.नं.११६/६, वाल्हेकर वाडी, चिंचवड, पुणे ४११ ०३३ मो.नं.९७६७२१५५१४	सदस्य
१०	निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे	जिल्हाधिकारी कार्यालय, (महसूल शाखा) पुणे	सदस्य-सचिव

सदर शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे या समितीवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या हया संबंधित सदस्याच्या पोलीस अहवालास आधीन राहून करणेत येत आहेत. तसेच या समितीवरील अशासकिय सदस्यांचा कार्यकाल या आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षे इतका राहील. त्यानंतर सदर अशासकीय सदस्यांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

(सौरभ राव)
जिल्हाधिकारी पुणे

प्रत :-

१) शाखाधिकारी, महसूल शाखा पुणे तथा सदस्य सचिव जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समिती यांचेकडे
२/- सोबतच्या आदेशाच्या प्रति संबंधित सदस्यांना बजावून त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेणेत यावी.

२) स्वीय सहाय्यक, मा. पालकमंत्री, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ३२.
२/- सदर समिती या आदेशान्वये गठीत केलीबाबत मा. मंत्री महोदय यांचे निदर्शनास आणून देणेस विनंती आहे.

३) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांजकडेस महितीसाठी सविनय सादर.

जिल्हाधिकारी पुणे करिता